# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा.क्र.तंशिविकापु/विवि/२०१९/ 4602 दिनांक :- 2019

प्रति,
प्राचार्य/संचालक,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व पदवी/पदव्युत्तर पदवी संस्था,
पुणे विभाग पुणे

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भाने अभिप्राय घेऊन २०२०-२१ मधील नियम आणि प्रवेश प्रक्रियेसंदर्भात अपेक्षित सुधारणांची माहिती सादर करणेबाबत..

संदर्भ :-१) मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र २अ/एडीएम/८२४ दिनांक ०४/११/२०१९

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया नुकतीच पार पडली आहे, प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने आपल्या संस्थेमधील अध्यापक,प्रवेशित विद्यार्थी तसेच पालक यांच्याकडून प्रवेश परीक्षा,प्रवेश नियम,ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया इत्यादी बाबत त्यांना आलेले अनुभव याबाबत त्याच्याकडून अभिप्राय घेण्याविषयी वरीष्ठ कार्यालयाने संदर्भिय पत्राद्वारे या कार्यालयास सूचित केलेले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा, प्रवेश प्रक्रिया याबाबतचे धोरण निश्चिती करण्याची कार्यवाही सुरु असल्याने प्रवेश परीक्षा कशा प्रकारे असाव्यात, प्रवेश प्रक्रियांमध्ये काही बदल आवश्यक आहेत किंवा कसे या बाबत धोरण ठरविण्या करीता संस्थेकडून अभिप्राय मागवण्यात येत आहे.

त्या अनुषगाने आपणास सुचित करण्यात येते की, आपल्या संस्थेतील अध्यापक, प्रवेशित विद्यार्थी तसेच पालक यांच्याकडून एकत्रितरित्या अभिप्राय दिनांक ११/११/२०१९ दुपारी १२:०० वाजे पर्यत या कार्यालयास हास्तदेय सादर करावा. म्हणजे अभिप्राय वरिष्ठ कार्यालयास सादर करणे शक्य होईल.

सोबत :- संदर्भिय पत्राची छायाप्रत.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: Internet:


क्रमांक: २

दिनांक :

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भाने अभिप्राय घेऊन २०२०-२१ मधील प्रवेश नियम आणि प्रवेश प्रक्रियेसंदर्भात अपेक्षित सुधारणांची माहिती सादर करणेबाबत....

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया नुकतीच पार पडली. या प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने आपल्या अधिनस्त असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था, या संस्थांमधील अध्यापक, प्रवेशित विद्यार्थी तसेच पालक या घटकांकडून प्रवेश परीक्षा, प्रवेश नियम, ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया इत्यादी बाबत त्यांना आलेले अनुभव याबाबत अभिप्राय घेण्यात यावेत.

या अभिप्रायाच्या पार्श्वभूमीवर आगामी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेश परीक्षा कशा प्रकारे असाव्यात, प्रवेश प्रक्रियांमध्ये काही बदल आवश्यक आहेत किंवा कसे इत्यादी बाबींसंदर्भात वरील संबंधित घटकांकडून अभिप्राय प्राप्त करुन घेऊन त्याबाबत आपले सुस्पष्ट अभिप्राय नमूद करुन एकत्रितरित्या संचालनालयास दिनांक १३.११.२०१९ पर्यंत सादर करण्यात यावेत.

पुढील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा , प्रवेश प्रक्रिया याबाबतचे धोरण निश्चित करण्याची कार्यवाही सुरू असल्यामुळे सदर प्रकरणी आपण गांभीर्याने लक्ष घालून वर नमूद संबंधित घटकांकडून अभिप्राय घेऊन ते विहीत वेळेत संचालनालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

(डॉ. अभय वाघ)

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई